क्रमांक : ज्येसू-१५२३/गट-ड-ता २३/१६०/प्रशा-२/ ८४५
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकिय इमारत, आठवा मजला,
मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दिनांक :- ०८/०८/२०२३

परिपत्रक

**विषय :- गट-ड संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक १/१/२०२३ रोजीची दिनांक १/१/२०२२ ते ३१/१२/२०२२ या कालावधीची तात्पुरती ज्येष्ठता सूची प्रसारीत करणे.**

संदर्भ :- (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्रमांक एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२८१/बारा, दि.२१/६/२०२१
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२८१/कार्या-१२, दि.१३/७/२०२१

महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना, दिनांक २१ जून २०२१ नुसार संचालनालयाच्या गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १/१/२०२२ ते ३१/१२/२०२२ या कालावधीत नियमित/तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त झालेल्या कर्मचा-यांची तात्पुरती ज्येष्ठतासूची संचालनालयाच्या http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसारीत केली आहे.

२/- या परिपत्रकान्वये सर्व संबधित कर्मचा-यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संकेतस्थळावर प्रसारीत केलेल्या तात्पुरत्या ज्येष्ठता सूचींबाबत त्यांचे काही वास्तविक आक्षेप अथवा त्रुटी (नांव, जन्मदिनांक, प्रवर्ग, रुजू दिनांक, ज्येष्ठता इत्यादी) असल्यास ते आक्षेप / त्रुटी हे परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनांकापासून तीन आठवड्याच्या आत संचालनालयाकडे त्यांच्या कार्यालयप्रमुखामार्फत पाठवावेत व एक आगाऊ प्रत संचालनालयास परस्पर पाठविण्यात यावी. आक्षेप कळविताना आपला ज्येष्ठताक्रम आक्षेपात नमूद करावा. जन्मदिनांक तद्वतच जातीच्या प्रवर्गासंबंधी आक्षेप असल्यास सेवापुस्तकाच्या पहिल्या पृष्ठाची, शाळा सोडल्याच्या दाखल्याची व जातीचे प्रमाणपत्र/जातीचे वैधता प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत अर्जासोबत संचालनालयास पाठविण्यात यावीत. मुदतीनंतर पाठविण्यात आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

३/- ज्या कर्मचा-यांची जाती दावा पडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत/जाती दाव्याची पडताळणी झालेली नाही अशा कर्मचा-यांच्या जाती दावा पडताळणीचा निर्णय प्राप्त होईपर्यंत त्यांची ज्येष्ठता अस्थायी स्वरुपातील असून त्यांच्या ज्येष्ठता सूचीतील जातीच्या नोंदी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून जात वैधता प्राप्त होईल या अटीस राहून नोंदल्या आहेत.

४/- प्रस्तुत परिपत्रक मिळाल्याची पोच उलट टपाली संचालनालयास संबंधित कार्यालयामार्फत पाठविण्यात यावी.

(नि.म.प्रभुदेसाई)
उप संचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

प्रति,
श्री./श्रीमती ---------------------------------------
शिपाई,
-----------------------------------------------------
-----------------------------------------------------

प्रत : १. सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय (सर्व) - सदरचे परिपत्रक गट-ड संवर्गातील कर्मचा-यांना देण्यांत यावे व त्याबाबतची पोच त्यांच्याकडून घेऊन संचालनालयास पाठविण्यांत यावी.
२. जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय (सर्व) - सदरचे परिपत्रक गट-ड संवर्गातील कर्मचा-यांना देण्यांत यावे व त्याबाबतची पोच त्यांच्याकडून घेऊन संचालनालयास पाठविण्यांत यावी.
३. कक्ष अधिकारी (का-१४२६), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**संवर्गाचे नाव - हवालदार/नाईक/रोनिओ शिपाई/यंत्रचालक/आवेष्टक**

**वेतनश्रेणी - S-३ : १६६००-५२४००**

**दिनांक १ जानेवारी २०२३ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची (दिनांक १.१.२०२२ ते ३१.१२.२०२२)**

| नियम ३ (२) (ब) नुसार ज्येष्ठता क्रमांक | शासकीय कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्तीचा मार्ग | जन्मदिनांक | प्रवर्ग | नियम ३ (२) (अ) नुसार संवर्गात प्रत्यक्ष रुजू दिनांक | ज्येष्ठतेचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| निरंक | | | | | | | | |

(नि.म.प्रभुदेसाई)
उप संचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

**संवर्गाचे नाव - शिपाई/पहारेकरी**

**वेतनश्रेणी - S-१ : १५०००-४७६००**

**दिनांक १ जानेवारी २०२३ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची (दिनांक १.१.२०२२ ते ३१.१२.२०२२)**

| नियम ३ (२) (ब) नुसार ज्येष्ठता क्रमांक | शासकीय कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्तीचा मार्ग | जन्मदिनांक | प्रवर्ग | नियम ३ (२) (अ) नुसार संवर्गात प्रत्यक्ष रुजू दिनांक | ज्येष्ठतेचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | श्री.आशिष सुदाम बहिरम | ना | २२-११-१९९९ | अज | ०७-०६-२०२२ | ०७-०६-२०२२ | ३०-११-२०५९ | |
| २ | श्रीमती सानिका शैलेश काळप | ना | ३१-१०-२००१ | खुला | २३-०६-२०२२ | २२-०६-२०२२ | ३१-१०-२०६१ | |
| ३ | श्री.मोहम्मद फैजान मोहम्मद अब्दुल फेरोज | ना | २५-०७-२००३ | खुला | २२-०६-२०२२ | २२-०६-२०२२ | ३१-०७-२०६३ | |

- ना - नामनिर्देशन
- प - पदोन्नती

(नि.म.प्रभुदेसाई)
उप संचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

D:\CHHAYA\ज्येष्ठतासूची\Class-4 Sen listPeon1.1.1.23T